मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
# दैनिक लोकनेता
बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# दावेदार कितीही असले तरी तिकीट एकालाच मिळणार

## विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारीवर गिरीश महाजन यांची प्रतिक्रिया

### पहिल्या यादीत नाव नाही म्हणजे येणारच नाही असे नाही

**भाजप नेत्या देवयानी फरांदे यांचे काल भाजपने जाहीर केलेल्या यादीत नाव नव्हते यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. यावर गिरीश महाजन म्हणाले, पहिल्या यादीत नाव नाही म्हणजे येणारच नाही असे नाही. अजून अंतिम यादी यायची बाकी आहे. पक्षश्रेष्ठी सगळ्या बाबी तपासून घेत आहेत आणि त्यानंतर ते तिकीट देतील. पण पहिल्या यादीत नाव आले नाही म्हणून आपले नाव येणारच नाही असे कोणी समजू नये, असे मला वाटते, असे मत गिरीश महाजन यांनी व्यक्त केले आहे.**

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

विधानसभा निवडणूक आता अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. अशात भाजपने रविवारी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यात जवळपास ९९ जागांवर उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. तसेच उमेदवारी न मिळाल्याने अनेकांनी नाराजी देखील व्यक्त केली आहे. यावर भाजप नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.माध्यमांशी बोलताना गिरीश महाजन म्हणाले, आगामी निवडणुकीसाठी काही ठिकाणी प्रमुख दावेदार आहेत. प्रत्येकाला वाटते की आपल्याला तिकीट मिळावे. गेल्या अनेक वर्षांपासून काम करत आहेत, तोलामोलाचे कार्यकर्ते आहेत, नेते आहेत. त्यामुळे स्वाभाविक आहे त्यांनी इच्छा व्यक्त करणे, मात्र तिकीट एकालाच मिळणार आहे. अशा अनेक ठिकाणी एका पेक्षा अधिक दावेदार आहेत, अनेक ठिकाणी भाजपला जागा पाहिजे, तिथे भाजपची चांगली शक्ती आमची त्या ठिकाणी आहे, कार्यकर्त्यांचे मोठे संघटन चांगले आहे. अशा ठिकाणी कार्यकर्त्यांना वाटते की ही जागा भाजपला सोडावी. या मागणीसाठी कार्यकर्ते देवेंद्र फडणवीस व चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटत आहेत, अशी माहिती भाजप नेते गिरीश महाजन यांनी दिली आहे.भाजप पक्षातील नेते राहुल आहेर हे एकमेव उमेदवार आहेत ज्यांनी उमेदवारीस नकार दिला आहे, मात्र त्यांचे नाव पहिल्या यादीत जाहीर करण्यात आले आहे. यावर गिरीश महाजन म्हणाले, राहुल आहेर गरवारे क्लब येथे जेव्हा देवेंद्र फडणवीस होते तेव्हाच त्यांना म्हणाले होते की मला उमेदवारी नको, माझ्या ऐवजी माझे चुलत भाऊ केदा आहेर यांना तिकीट देण्यात यावे, अशी मागणी राहुल आहेर यांनी माझ्या समोरच केली होती. देवेंद्र फडणवीस यांनी देखील हे मान्य केले होते. मात्र वरूनच राहुल आहेर यांचे नाव पुढे आले आहे.



### विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा फॉर्म्युला काय आहे?

**विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा फॉर्म्युला काय आहे, असा प्रश्न विचारला असता तेव्हा गिरीश महाजन म्हणाले, आमच्या ज्या जागा आहेत, जिथे आमचे विद्यमान आमदार आहेत, याच जागांवर आम्ही दावा सांगितला आहे. अशा कुठल्या जागा ज्या जाहीर करण्यात आल्या आहेत त्यावर मित्रपक्षातून वादग्रस्त तरी काही बोलण्यात आले नाहीये. त्यामुळे आमच्यात जागेवरून वाद नसल्याचे गिरीश महाजन म्हणाले. कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात शिवसेना पक्षातील अनेक पदाधिकारी व नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, काही ठिकाणी वाद आहेत, मात्र महायुती म्हणून आम्ही ताकदीने निवडणूक लढवणार आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.**

## ज्या भावी आमदारांना कुठलाही राजकीय पक्ष उमेदवारी देण्यास तयार नाही ते तालुक्याचा विकास काय करणार

लोकनेता न्यूज नेटवर्क
श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले

श्रीगोंदा. तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापत आहे या मध्ये मतदारांचे मात्र चांगलेच मनोरंजन होत आहे असे असताना काही स्वयंघोषित आमदार पक्ष निष्ठा खुटिला टांगुन ठेवत तिकीट मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षात प्रवेश करण्यास तयार आहेत परंतु या स्वयंघोषित आमदारांची मागील राजकीय कुंडली पहाता कुठलाही पक्ष उमेदवारी देण्यास तयार नाही म्हणून प्रसंगी अपक्ष उमेदवार म्हणून लढण्याची तयारी करताना दिसत आहेत असे जरी असले तरी सेवटी अपक्ष उमेदवारी केली तरी मतदार यांना स्विकारणार का हा खरा प्रश्न आहे कारणं मतदार सुध्दा हुशार आहेत अपक्ष म्हणून निवडून





आले तरी विकास निधी उपलब्ध होणार नाही म्हणजेच तालुका पुन्हा पाच वर्षे विकासापासून वंचित होईल असी मतदारांची सुप्त चर्चा होताना दिसत आहे तर युतीची उमेदवारी डॉ प्रतिभा पाचपुते यांना जाहीर झाली असली तरी तालुक्यातील मतदारांच्या मनात आमदार विक्रमसिंह पाचपुते पाहिजे हे प्रतिभा पाचपुते यांच्या लक्षात आले आहे त्यामुळे आमदार बबनरावजी पाचपुते व प्रतिभा पाचपुते हे दोघेही मुंबई ला मुलांसाठी उमेदवारी मागायला गेले आहेत परंतु पक्षाने डॉ प्रतिभा पाचपुते यांच्या नावाला पसंती दिली असल्याचे खात्रीलायक वृत्त आले आहे आघाडीच्या उमेदवारी साठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राहुल जगताप फायनल करण्यात आले असल्याचे समजते तर स्वयंघोषित आमदार सेवटचा प्रयत्न म्हणून शिवसेना ठाकरे यांच्या ही दारी उमेदवारी साठी गेल्याचे समजते उमेदवारी नाही मिळाली तर प्रसंगी अपक्ष उमेदवारी करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त मिळाले आहे उमेदवारी च्या पहिल्या घासाला खडा लागल्याने पक्ष निष्ठा खुटिला टांगुन ठेवत अपक्ष उमेदवारी केली तरी मतदारांमध्ये वेगळीच चर्चा चालू आहे की यांना कुठलाच पक्ष उमेदवारी देण्यास तयार नाही तर आपण आपलं मत कस द्यायचं एकंदरीत पाहता स्वयंघोषित आमदारांच्या उमेदवारी बाबत अडचणी वाढत आहेत हे मात्र नक्की..

## नातीच्या वाढदिवसात वृक्षवाटप एक स्तुत्य उपक्रम-श्री.प्रमोद मोरे



लोकनेता न्यूज नेटवर्क
आष्टी | अण्णासाहेब साबळे

जामखेड येथील निर्सग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे जिल्हा उपाध्यक्ष श्री.मोहन खवळे यांची नात कु.सावी हिच्या वाढदिवसानिमित्त मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद मोरे बोलत होते ते म्हणाले कि प्रत्येकाने पर्यावरणाची काळजी घेतले पाहिजे.श्री.खवळे सरांनी वाढदिवसानिमित्त वृक्षवाटप करून समाजापुढे आदर्श ठेवला आहे.हा आदर्श प्रत्येकांने घेऊन समारंभात वृक्षवाटप केले पाहिजे.आपणांस दिलेल्या रोपाचे आपण आपल्या घरा समोर लावून त्याचे जतन करावे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी श्री.संजय गायकवाड सर,श्री.अमोल जाधव,श्री.राम निकम,श्री.अंकुश ओमासे,श्री.सचिन पवार, श्री.विजयकुमार जाधव,श्री. अशोक घोडेस्वार,श्री.मल्हारी पारखे,श्री.हराळ,श्री.प्रताप गांगर्डे,श्री.आखडे अदि मान्यवर व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुत्रसंचलन श्री.संजय गायकवाड सर यांनी केले तर आभार राज्य कार्याध्यक्ष उत्तम पवार यांनी मानले.

## लोहा तालुक्यात पावसामुळे कपाशीचे नुकसान सोयाबीन कापणी त खोडा

लोकनेता न्यूज नेटवर्क
लोहा | विशाल घंटे

लोहा तालुक्यात परतीच्या पावसाने शनिवारी रात्री नऊ नंतर मेघगर्जनेसह हजेरी लावली. विजांचा कडकडाट व पाऊस धो धो बरसल्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील काही ठिकाणी विज पुरवठा खंडित झाला त्यामुळे विज कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. तालुक्यातील माळाकोळी या ठिकाणी अतिवृष्टी झाली व शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले.परतीच्या पावसामुळे सोयाबीन पीक काढणी व मळणीस खोडा घातला पण तूर यासह रब्बी पिकास जीवदान मिळाले आहे. पावसाळा संपून हिवाळा सुरू झाला तसा पाऊस जाईल असे वाटत असताना परिसरात दिवसभर तीव्र उकाडा व उन्हामुळे नागरिक लहान मुले या सर्वांनाच गर्मीचा त्रास सहन करावा लागत आहे व दुसऱ्या



दिवशी सोमवारी सुद्धा ढगाळ वातावरण असल्यामुळे शेतकरी आपापल्या शेतामध्ये सोयाबीन व आपली पिके याबद्दल काळजीत आहेत.

## शिवछत्रपती प्रा.व माध्यमिक शाळा येथे नवनित युवप्रकाशन निमित्य चित्रकला स्पर्धा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क
लोहा | विशाल घंटे

नवनित युवा प्रकाशनच्या वतीने आयोजित चित्रकला स्पर्धा शिवछत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात घेण्यात आले यात १००हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.प्राथमिक शाळेतील प्रथम द्वितीय आलेल्या व प्रोत्साहनपर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले बक्षीस वितरण सोहळ्यासाठी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक दामोधर वडजे यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ,हरिहर धुतमल होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आर आर पिठ्ठलवाड,पवार सर, राहुल पारेकर , रामेश्वर जमागे, आढाव मॅडम, मीना मॅडम, कोमल मॅडम,सोशल मीडिया हणमंत पांचाळ, संग्राम चव्हाण पत्रकार,शिक्षिका श्रीमती आढाव, विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका मीना पवार शिक्षक रामेश्वर जामगे, कोमल काळबांडे, याची उपस्थिती होती. क्रमांक मिळालेले विद्यार्थी सिद्धी हनुमंत पांचाळ, (वर्ग तिसरा) राजनंदनी संग्राम चव्हाण, (वर्ग दुसरा) कारुण्य कपिल काळबांडे, (वर्ग चौथा.) चंद्रकांत व्यंकट पवार,( वर्ग चौथा) आनंद शिंदे, (वर्ग दुसरा.), आलिया शेख, (वर्ग तिसरा. ) यांचा बक्षिसे देण्यात आली. शिक्षिका मिनाताई पवार कळकेकर याचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व संचलन मुख्याध्यापक हणमंत पवार यांनी केले.

### चारोळी

नात्यांचा धागा
अलगद गुंफत जावा
स्वार्थ न ठेवावा मनी
खरा अर्थ जाणूनी घ्यावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## काँग्रेसची पहिली यादीही उद्याच येणार-नाना पटोले

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेसची महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीची पहिली यादी उद्या जाहीर होणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी दिली. महाविकास आघाडीचे जागावाटपही उद्याच होणार असल्याचे ते म्हणाले.निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी राज्यातील २८८ जागांसाठी एकाच टप्प्यात निवडणूक होईल. त्यानंतर २३ तारखेला मतमोजणी होईल. तत्पूर्वी, महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा घोळ अद्याप संपला नाही. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काँग्रेस व मित्रपक्षाच्या १२ जागांवर दावा केल्यामुळे हा घोळ लांबला आहे. या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी दिल्लीत धाव घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना महाविकास आघाडीचे जागावाटप उद्या निकाली निघणार असल्याचा दावा केला आहे.नाना पटोले म्हणाले, विदर्भातील जागांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व काँग्रेसमध्ये कोणताही वाद नाही. माध्यमांनी उगीच आमच्यात भांडण लावू नये. मंगळवार सायंकाळपर्यंत महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे जागावाटप जाहीर होईल.

# शिरूर अनंतपाळ येथे तिसऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी कवी संमेलनाची जय्यत तयारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त दिनांक १०/११/२०२४ रोजी नवोदित साहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे श्री अनंतपाळ ग्रामीण मराठी ३ रे राज्यस्तरीय कविसंमेलन आयोजित संपन्न होत. आहे या कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणु मा डॉ विजयकुमार कस्तुरे जेष्ठ कवी लेखक गीतकार ( बुलढाणा) हे असनार आहेत. कविसंमेलनाचे *उदघाटक मा श्री डॉ शिवाजीराव बंडप्पा काळगे साहेब. ( खारदार लातूर लोकसभा) शुभ हस्ते समाज रत्न मा श्री हृदयजॉकी अमरदिप मखामले साहेब ( छंदोगामात्य आंतरराष्ट्रीय मंच पुणे) मा श्री गोविंद पेद्देवाड साहेब ( तहसीलदार शिरूर अनंतपाळ) मा श्री बी,टी,चव्हाण साहेब ( गटविकास अधिकारी प स शिरूर अनंतपाळ ) मा श्री विठ्ठलराव दराडे साहेब ( पोलिस निरीक्षक शिरूर अनंतपाळ) मा श्री दिनकरराव माने साहेब ( माजी आमदार औसा तथा शिवसेना उ बा ठा जिल्हा प्रमुख लातूर) मा श्री संभाजीराव पाटील साहेब ( मा जि उपाध्यक्ष लातूर) मा श्री शिवाजीराव माने साहेब ( शिवसेना शिंदे गट जिल्हा प्रमुख लातूर) जयश्रीताई पाटील ( मा जि उपाध्यक्ष लातूर) मा श्री लिंबन महाराज रेशमे ( शिवसैनिक निलंगा विधानसभा) मा श्री जयश्रीताई उटगे ( शिवसेना उ बा ठा जिल्हा प्रमुख महिला आघाडी लातूर)मा श्री कवयित्री सरोजा गायकवाड ( शिवसेना उ बा ठा जिल्हा उपसंघटिका लातूर शिरूर अनंतपाळ देवणी निलंगा)मा श्री डॉ शोभाताई बेंजरगे ( निलंगा विधानसभा मतदारसंघ) मा श्री संगीताताई अशोकराव पाटील ( निलंगा विधानसभा मतदारसंघ)

प्रमुख पाहुणे

मा श्री प्रभाकर गुरुजी ( शिक्षण तज्ञ शिरूर अनंतपाळ) मा श्री डॉ अरविंद भातांब्रे साहेब ( कॉग्रेस शेल जिल्हा अध्यक्ष लातूर) मा श्री शिवाजीराव पेटे साहेब ( जिल्हा अधीक्षक रयतक्रांती संघटना लातूर) मा श्री आनिलजी बिडवे साहेब ( आगार व्यवस्थापक निलंगा) मा श्री संतोष भाऊ शेटे साहेब ( न प शिरूर अनंतपाळ मा उपाध्यक्ष) मा श्री भागवत वंगे साहेब ( शिवसेना ता प्रमुख उ बा ठा शिरूर अनंतपाळ) मा श्री एल बी आवाळे साहेब ( गूरुजी शिरूर अनंतपाळ) मा श्री कल्याणराव बर्गे साहेब ( रा का शरद पवार) मा श्री मंगेश पाटील ( भा ज पा ता अध्यक्ष शिरूर अनंतपाळ) मा श्री बस्वराज मठपती ( कॉग्रेस नेते) मा श्री सुष्मा मठपती ( न प उपाध्यक्षा शिरूर अनंतपाळ) मा श्री रेखा पुजारी ( शिवसेना उ बा ठा निलंगा ता प्रमुख) मा श्री अशोक कोरे साहेब ( कॉग्रेस शहर अध्यक्ष शिरूर अनंतपाळ) मा श्री व्यंकटेश हंद्राळे साहेब ( रा का शरदचंद्र पवार शि अध्यक्ष) मा श्री पद्मनाभन गायकवाड साहेब शिरूर अनंतपाळ रा का शहर अध्यक्ष) मा श्री संजय बिरादार साहेब ( कॉग्रेस नेते) मा श्री उमाकांत बोळेगावे ( चेअरमन रा भा दु संघटना शिरूर अनंतपाळ) मा श्री सुनिल बसपुरे साहेब ( मा नगरसेवक लातूर) मा श्री शिवलींग लासुने साहेब मा श्री बालाजी येरोळे साहेब ( म सा पा शिरूर अनंतपाळ शाखा अध्यक्ष) मा श्री चोचंडे प्रभाकर राव साहेब ( उपाध्यक्ष ओबीसी सेवा संघ महाराष्ट्र) मा श्री डॉ मन्मथ भातांब्रे साहेब ( बालरोग तज्ज्ञ लातुर)

दुसरे सत्र

**कवी संमेलन अध्यक्ष डॉ विजयकुमार कस्तुरे साहेब जेष्ठ कवी लेखक गीतकार (बुलढाणा)**

**प्रमुख पाहुणे**

मा श्री सौ अनुराधा प्रविण वायकोस (परभणी ) मा श्री कवयित्री सरोजा गायकवाड मॅडम ( शिवसेना उ बा ठा जिल्हा उपसंघटिका लातूर शिरूर अनंतपाळ देवणी निलंगा) मा श्री कवयित्री पुजा संतोष राव माळी(बारामती) कवयित्री शशिकला गुंजाळ ( भुम) कवयित्री लेखिका अल्काताई सपकाळ ( सांगली)मा श्री भिक्यनी संघमित्रा एस एम ( मुंबई) ह भ प सौ शिला चिवरकर ( कारंजा लाड) मा श्री डॉ बबनराव महामुने (संभाजीनगर) मा श्री डॉ डी व्ही खरात ( संभाजीनगर)

**निवेदक**

१) मा श्री प्रमोद कुलकर्णी/ गायक/निवेदक ( पुणे)
२) मा श्री पुजा जैन गायक/ निवेदक/पुणे

सुत्रसंचलन

मा श्री जेष्ठ कवी अॅड उमाकांत आदमाने पुणे ( नोटरी भारत सरकार)

पुरस्कार्ती

१) मा श्री प्रमोद कुलकर्णी पुणे (सर्वोत्कृष्ट गायक व निवेदक)
२)मा श्री ओमप्रकाश तांबोळकर येरोळ (उत्कृष्ट पत्रकारिता)
३) मा श्री सतीश मल्लाडे साकोळ ( सर्वोत्कृष्ट समाज गौरव पत्रकारिता)
४) मा श्री डॉ मधुकर हुजरे धाराशिव (उत्कृष्ट साहित्यिक)
५) मा श्री कवयित्री सरोजा गायकवाड उ बा ठा जिल्हा उपसंघटिका लातूर शिरूर अनंतपाळ ( साहित्य हिरकणी)
६) कवयित्री पुजा संतोष राव माळी समाजसेविका बारामती ( साहित्य हिरकणी)
७) कवयित्री उर्मिला झगडे बारामती ( साहित्य हिरकणी)
८) मा श्री ऑड उमाकांत आदमाने (पुणे उत्कृष्ट निवेदक )
९) कवयित्री विमलताई माळी आधुनिक बहिणाबाई (सर्वश्रेष्ठ कवयित्री)
१०) कवयित्री संघमित्रा एस एम मुंबई रायगड ( शाक्यमुनी बुद्ध)
१२) कवयित्री शशिकला गुंजाळ (निसर्ग कन्या )
१३) कवयित्री ज्योती इंगोले परभणी (सर्वोत्कृष्ट समाज गौरव)
१४) कवी अशोक मोहिते सोलापूर ( सर्वोत्कृष्ट साहित्यिक)
१५) कवयित्री गझलकार अनुराधा वायकोस परभणी (साहित्य हिरकणी)
१६) कवी गीतकार अजयकुमार वंगे लातूर (साहित्य रत्न)
१७) कवी नागोराव सोनकुसरे नागपूर (साहित्य रत्न)
१८) कवयित्री समिंदर शिंदे लातूर (उत्कृष्ट लेखिका )
१९) कवयित्री लक्ष्मीदेवी रेड्डी पुटलुरी आंध्रप्रदेश ( साहित्य हिरकणी)
२०)सौ सुरेखा बाबुराव बोरोळे येरोळ ( बँक सखी)

**कवितेच्या बागेतील सहभागी कवी/ कवयित्री**

१) कवयित्री वसुधा वैमव नाईक ( पुणे)
२)कवयित्री सरोजा गायकवाड (शिरूर अनंतपाळ)
३) कवयित्री पुजा संतोष राव माळी (बारामती)
४) कवयित्री सोनाली रायपुरे ब्रम्हपुरी (चंद्रपुर)
५) कवयित्री वनिता दिनकर जाधव (बारामती)
६) कवयित्री ह भ प सौ शिला चिवरकर (कारंजा लाड)
७) कवी ओंकार राठोड (यवतमाळ)
८) कवी बाळासाहेब मगर (धाराशिव)
९) कवयित्री वैशाली लांजेकर ( चंद्रपूर)
१०) कवयित्री वैभवी माने अय्यर ( उल्हासनगर)
११) कवी परशुराम कुंडलीक कांबळे ( कोल्हापूर)
१२) कवी नागोराव सोनकुसरे (नागपूर)
१३) कवयित्री राणी चोपडे ( परभणी)
१४) कवयित्री छाया पायमोडे (नवीमुंबई)
१५) कवी सरकार इंगळी (कोल्हापूर)
१६) कवी होटे विमुक्तीदास वैजनाथ (नांदेड)
१७) कवी गणेश शिवाजी भालेराव (नांदेड)
१८) कवी कळसे बी जी ( नांदेड)
१९) कवी चंद्रकांत कदम ( बेळगाव)
२० ) कवी योगेश खंडझोडे (पुणे)
२१) कवी प्रल्हाद घोडबांड (नांदेड)
२२) कवयित्री पल्लवी येवले (पुणे)
२३ कवयित्री सारिका राजेंद्र सोनजे (नाशिक)
२४) कु सान्वी माशेलकर ( गोवा)
२५) कवयित्री सारिका सगुन माशेलकर (गोवा)
२६) कु प्रथमा नाईक (गोवा)
२७) कवी गणेश नाईक ( गोवा)
२८) कवयित्री संघमित्रा एस एम (मुंबई रायगड)
२९) कवी श्रीराम घडे (परभणी)
३०) कवी अजय गणवीर (बृ मुंबई)
३१) कवी महेश पिचारे (येरोळ)
३२) कवयित्री समिंदर शिंदे (लातूर)
३३) कवी रामेश्वर सोरगे ( लातूर)
३४) कवी अंगद श्रीपती भुरे (लातूर)
३५) कवी कांचनदत्त दत्तात्रेय पाटील (कोल्हापूर)
३६) कवी सुमित हजारे (कल्याण)
३७) कवी अजयकुमार वंगे (लातूर)
३८) कवयित्री राणी धनवे (मंगळवेढा)
३९) कवयित्री वाघमारे उषा (लातूर)
४०)

१) कवयित्री छाया विश्वनाथ कांबळे ( लातूर)
२) कवी अंकुश पडघान ( बोरगाव चिखली)
३) कवी रमेश खंडारे ( बुलढाणा)
४) कवयित्री वर्षा कंकाळ (सिंदखेड राजा)
५) कवयित्री तृप्ती महाले (बुलढाणा)
६) कवयित्री विद्या सरपाते ( होनार)
७) कवी राजेश थबकर (अलिबाग रायगड)

**सहकार्य**

१) मा श्री गणपत चाकुरे
२) मा श्री सतीश शिवणे
३) मा श्री शिवाजी रायवाडे
४) मा श्री शिवलींग लासुने
५) मा श्री नागनाथ भातांब्रे
६) मा श्री संतोष गायकवाड
७) मा श्री शोभाताई बेंजरगे
८) मा श्री दिनकरराव माने
९) मा श्री शिवाजी मठपती
१०) मा श्री उमाकांत बोळेगावे
११) मा श्री अविनाश रेशमे
१२)मा श्री नंदकुमार मळगे

अनेक महाराष्ट्रातुन कवी व कवयित्री मोठ्या संख्येने उपस्थित रहाणार असल्यासी माहिती कवी संमेलनाचे आयोजक कवी गोविंद श्रीमंगल यांनी दिली आहे.

---

लोकनेता न्यूज नेटवर्क

आजपर्यंत मैत्री या विषयावर खूप लेखन झाले आहे मैत्री हे नातं इतर नात्यापेक्षा वेगळे आणि खूप खास अस आहे रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीचे नाते हे खूप अतूट, निस्वार्थी, निरागस असते.मित्रमैत्रिणीच्या सहवासातून तुमचे जीवन सुंदर बनते आणि जर ती मैत्री सुद्धा वेगळी असेल तर जीवन लयासही जाऊ शकते. सुंदर आयुष्याची कधी घडी विस्कटेल हे सांगणे पण अशक्य थोडक्यात तुमच्या आयुष्य घडवायचे की बिघडवायचे हे सारे काही मित्र-मैत्रिणींच्या सहवासावर त्यांच्या वर्तनावर अवलंबून असते आयुष्याचे वेलीवर उमलणारे मैत्रीचे फुल हे दोन्ही बाजूने हळुवारपणे जपले पाहिजे मग तुमच्यावर कोणतेही संकट येऊ दे, जीवघेणी परिस्थिती निर्माण होऊ दे. मैत्रीच्या आधार हा तुमच्यासोबत असेल तर ही जीवन नौका सहज पार करता येते फक्त तुमच्या दुःखात आणि अडचणीतच नाही तर तुमच्या आनंदी, यशस्वी जीवनात मित्र-मैत्रिणी असतील तर तो आनंद अजूनच द्विगुणित होतो मैत्रीमध्ये एकमेकावर विश्वास असेल तर कोणतीच गोष्ट लपून ठेवली जात नाही नावाला फक्त मैत्री आहे असे न होता कोणतीही गोष्ट कुठलाच अडपडदा न ठेवता केवळ आणि केवळ मैत्रीमध्ये व्यक्त करता येते एखाद्या गोष्टीने होणारा मनाचा कोंडमारा असेल किंवा आनंदाने ओथंबून भरलेला असा कोणताही क्षण असेल तो व्यक्त करण्याची हक्काची जागा, हक्काचं माणूस म्हणजे मैत्री कधी एकदा त्या व्यक्तीला भेटून जी काही गोष्ट असेल ती व्यक्त करण्याची आतुरता, ओढ लागलेली असते ती दुसऱ्या कुठल्याच नात्यात शक्य नाही. दोन्ही बाजूंनी मैत्रीचा धागा हळुवारपणे अलगदपणे विणला जातो. मैत्रीण सोबत आहे म्हणजे सगळं जग आपल्या



सोबत आहेत. आपण कोणतेही काम अशक्य वाटू शकते ते सहजतेने पार पाडू शकतो ते केवळ मैत्रीच्या शाब्दिक आधारावरच. प्रत्येकालाच कायम सुखद अशी मैत्री मिळू शकत नाही आणि ती मिळालीच तर ती आयुष्यातील खूप महत्त्वाची अशी संपत्ती समजून हे नातं जीवापाड जपलं पाहिजे. आयुष्याच्या सायंकाळी सुद्धा मैत्रिणींची आठवण झाली तर सुखद क्षण,एकत्र घालवलेले अनमोल दिवस डोळ्यासमोर तरळून जायला हवेत. कायम एकमेकांना आधार सहकार्य करणारी मैत्री असावी ना की एकमेकांचा द्वेष, मत्सर करणारे एकमेकांचे पाय ओढणारे अशी मैत्री म्हणजे नावाला काळीमा फासणारी गोष्ट आहे. नावालाच फक्त मैत्री आणि व्यवहार मात्र एकमेकांचे शत्रू असल्यासारखे करणे हे तत्व मैत्री या वाक्यात बसू शकत नाही. इतिहासात अतूट मैत्रीचे अनेक उदाहरणे आपल्याला पाहायला भेटतात मैत्रीमध्ये जात, धर्म, वर्ण, गरीब श्रीमंत असा कुठलाच अडथळा येत नाही. दोन व्यक्तीचे विचार जुळून आले आणि आपोआप त्यांच्या मैत्रीचा धागा जोडला जातो आयुष्याची सुंदर वस्त्र अनुभवायचे असेल तर ते केवळ आणि केवळ मैत्रीच्या नात्यामुळे शक्य होते .मैत्रीवर जेवढे काही लिहावे तेवढे कमीच आहेत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मैत्रीच्या नात्याचे खूप मोठे असे योगदान सगळ्यांनीच मान्य करावे असे आहे.

**-डॉ.शोभा अनिल चाळके - म्हमाने**

---

# जि.प.मध्ये दर्जेदार शिक्षण सुविधा मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थी पुणे जिल्ह्यामध्ये स्थिरावले-सुरेश धस

## मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही नागरिकांची गर्दी तर सर्वत्र धसांचे जंगी स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

### मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही नागरिकांची गर्दी तर सर्वत्र धसांचे जंगी स्वागत

**वाकड,रूपीनगर,हडपसर आणि रांजणगाव या ठिकाणी झालेल्या कौटुंबिक स्नेह मेळाव्यात सुरेश धस यांचे जोरदार स्वागत करण्यात आले वाकड येथे हलगी पथकाचा आवाज घुमला तर हडपसर व रांजणगाव येथे मतदार संघातील उपस्थित नागरिकांनी धस यांच्यावर पुष्पवृष्टी केली.**

आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन आपण राजकारणात आलो सरपंच मनापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे लक्ष देऊन दर्जेदार शिक्षण घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे तात्कालीन पहिली ते सातवीतील असलेले विद्यार्थी आज पुणे जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रात स्थिरावले आहेत याचा आपणास अभिमान वाटत असून त्यांच्यासाठी काही करता आले याची समाधान वाटत आहे असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांच्या वाकड,रूपीनगर,हडपसर आणि रांजणगाव येथे आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

पुढे बोलताना धस म्हणाले की,पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात आपल्याकडील लोक कार्यरत आहेत आयटी क्षेत्रात असतील व्यावसायिक क्षेत्रात असतील ड्रायव्हर क्षेत्रात देखील आपल्या भागातील मुले बहुसंख्येने आहेत जे की स्वतःची वाहने घेऊन या क्षेत्रात आलेली आहेत १९९९ पासून आज पर्यंत गोरगरिबांची शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असलेल्या घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाद्वारे दर्जेदार मिळावे यासाठी शैक्षणिक कार्यावर भर देत आलेलो आहे ज्यावेळेस मी पहिल्यांदा जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झालो त्यावेळेस शिक्षकांचा तुटवडा आणि असलेल्या रिक्त जागा मला जाणवत होत्या त्यात तात्काळ भरण्यासाठी मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी मला या निर्णयासाठी सर्वाधिकार दिले आणि त्यावेळेस एक हजार शिक्षकांची मेगा भरती करण्याचे काम पहिल्यांदा मी केलं २००१ ते २००५ पर्यंत ही रमणी पॅटर्न लागू केला ३० टक्के गुणवत्ता असलेल्या शाळा त्या २००५ साली ६८.६०% पर्यंत गेल्या आणि याच कालावधीमध्ये असलेले पहिले ते सातवी वर्गातील मुलं आज आपल्याला पुणे जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहेत माझ्या मतदारसंघातील जरेवाडी ची ३० विद्यार्थी पटसंख्या असलेली शाळा आज १३०० विद्यार्थ्यांची झालेली आहे आज त्या शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश घ्यायचा असेल तर त्याला वेटिंग आहे शिवाय कोतन येथील शाळा देखील त्याच धर्तीवर मार्गक्रमण करत आहे त्या ठिकाणचे मिसाळ नावाचे शिक्षक तर जरेवाडी चे संदीप पवार हे शिक्षक गुणवत्ता वाढीचे प्रामाणिकपणे काम करत आहेत अशा शिक्षकांची आज प्रामुख्याने गरज आहे माझ्या कार्यकाळात जिल्हा परिषद शाळेच्या खुल्या असतील अंगणवाडी खुले असतील त्याला भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचे काम मी प्रामाणिक केले मात्र २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२४ या दहा वर्षाच्या कार्यकाळात दोन लोकप्रतिनिधी यांच्या कार्यकाळात ७८४ शाळा खोल्या या कमी असून ४५० ते ५०० अंगणवाड्या खोल्या देखील उपलब्ध करून शकले नाहीत हे विदारक चित्र आज मतदारसंघाचे आहे. दहा वर्षात हे दोन्ही आजी-माजी लोकप्रतिनिधी कधी कोणाच्या सुखदुःखात दिसले नाहीत. परंतु माझे संपूर्ण कुटुंब मी माझे भाऊ देविदास आबा माझा पुतण्या श्याम माझा मुलगा जयदत्त दुसरा मुलगा सागर हे नेहमी २४ तास जनतेमध्ये राहून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचे आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम प्रामाणिकपणे करतो.२००४ ते २००९ या कालावधीत सेना मेहेकरीचे काम हाती घेतले २००९ ते २०१४ या कालावधीत हे काम जवळपास ९७% पूर्ण करण्याचे काम मी केले.खुंटेफळ साठवण तलाव करताना विरोधकांचे दगडं अंगावर घेतले परंतु तसूभरही मागे हटलो नाही असे सांगत गोदावरी खोरे,मांजरा खोरे, सिंदफणा खोरे यामध्ये जायकवाडी खोऱ्यातून उपलब्ध होणारे ५८ टीमसी येणारे पाणी आगामी काळात पाटोदा, शिरूर कासार तालुक्यातील सतत दुष्काळाला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी,सिंचनासाठी उपलब्ध करून देणारच आहे असा दुर्दम्य विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.यावेळी नगरसेवक शांताराम भालेकर, हिंजवडीचे सरपंच दत्ता साखरे, माझी सभापती सुरेश हुळवले, मल्हारी साखरे,कासार साई चे सरपंच ललित शिंदे नगरसेवक गोपाळ माळेकर,नगरसेवक बाबा त्रिभुवन माजी सभापती प्रमिलाताई सगळे,उद्योजक बंडूशेठ तोडकर उद्योजक शहादेव चौधरी,सतीश कंठाळे, बापू तांबे,कुमार कोकणे,गणेश कदम,दीपक गुंड,राजू वलवळे, अनिल टेकाळे,सोमीनाथ मंडलिक,बापू तांबे,स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे ऊसतोड मुकादम संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप, हडपसर नगरसेविका उज्वला जंगले,सुभाष जंगले,सोमनाथ जराड या कार्यक्रमाचे नियोजन उद्योजक अनिल टेकाळे, राजेंद्रजी वलवळे,विनोद शिंदे,दीपक गुंड,कुमार कोकने,शकर जरांगे,कृष्णा बांगर,राजू चखाले,चिंचोली सरपंच मारुती सांगळे, गणपत जगताप,हिरामण बुचुडे,युवा नेते जय साखरे,विकास एकशिंगे,गणेश कदम,सर्जेराव कचरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# अपात्र असुनही लाभ घेणाऱ्या लाडक्या बहिणी कडून होणार हप्त्यांची वसुली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राकेश साळवी । मीरा भाईंदर**

राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेचा नियम डावलून पैसे घेणाऱ्या बहिणीनं कडून वसुली करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महिलांची मते मिळावी या आशेने लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजने साठी ज्या महिला अर्ज करतील त्यांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. परंतु या योजनेसाठी काही नियम आणि अटी ठेवल्या होत्या.

ज्यात पात्रता खालील प्रमाणे हवी

: महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.

२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

३. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत.

४. लाभार्थ्याचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असावे.

५. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

तसेच अपत्रतेचे नियम खालील प्रमाणे आहेत:

१. ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयापेक्षा अधिक आहे.

२. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.

३. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित / कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग / उपक्रम/मंडळ / भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि, रु. २.५० लाखा पर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी




पात्र ठरतील.

४. सदर लाभार्थी महिला शासनाच्या इतर विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेद्वारे दरमहा रु. १५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा लाभ घेत असेल.

५. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार / आमदार आहे.

६. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन / उपक्रमाचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.

७. ज्यांच्याकडे चारचाकी वाहन (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहे.

निराधार महिलांना आधार मिळावा, आर्थिक सहकार्य मिळावे म्हणून राज्य सरकारने ही योजनेला आणली होती.

ज्या महिलांनी या आधी देखील शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे त्यांना देखील या योजनेचा लाभ घेता येणार नाही. असे असताना देखील असंख्य महिलांनी या योजने साठी अर्ज केले आणि लाभही घेतला आहे. ज्या महिला पात्र आहेत त्यांनाच या योजनेचा लाभ घेता येईल तसेच ज्या अपात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेत त्यांच्या कडून शासना द्वारे वसूल केले जातील.

सदर अर्ज शासकीय कर्मचाऱ्यान कडून घाईगर्दीत मंजूर करून महिलांच्या खात्यात पैसे जमा ही केले गेले. राज्य शासनाला जाग आल्यावर आता या गोष्टीची पडताळणी करून

ज्या महिला पात्र आहेत त्यांनाच या योजनेचा लाभ घेता याईल तसेच ज्या अपात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेत त्यांच्या कडून शासन द्वारे वसूल केले जातील.शासनाच्या या निर्णयामुळे महीला मध्ये मोठा संताप व्यक्त होत असून अधिाऱ्यांकडून योग्य ती छाननी न झाल्यामुळे तसेच कामात दुर्लक्ष केल्याने संबंधित अधिकारी जबाबदार आहेत व वसुली त्यांच्याकडूनच करण्यात यावी अशी मागणी केली आहे. यात लाडक्या बहिणींचा काय दोष? असा उलट सवाल ही करण्यात आला.

# भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी १३० घरांच्या नालेवाडी ग्रामस्थांनी दिली १ कोटी ४० लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना



बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे (नालेवाडी ता.अंबड, जि.जालना) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी ४० लाख रुपये झाली. विशेष म्हणजे देणगीचा हा आकडा केवळ १३० घरांचा आहे.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.


# खेड-शिवापुर टोल नाक्यावर पाच कोटी रुपयांची वाहतूक करणारी गाडी सापडली

## गाडी सांगोल्याच्या बड्या नेत्याची असल्याचा संशय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राजगड । बबनराव धायतोंडे**

राज्यात निवडणुकीच्या अनुषंगाने ठिकठिकाणी भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली असून,संशयास्पद वाटणाऱ्या वाहनांची पोलिसांकडून झडती घेतली जात आहे.याच अनुषंगाने पुणे-सातारा महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्यावर आज सायंकाळच्या सुमारास एका वाहनामधून काही रक्कम नेण्यात येत असल्याची माहिती राजगड पोलिसांना मिळाली.त्यानुसार राजगड पोलिसांनी संबंधित वाहनाची झडती घेतली असता त्या वाहनामध्ये तब्बल ५ कोटी रुपयांची रोख रक्कम पोलिसांना मिळून आली आहे.तसेच सदर वाहन हे सत्तेतील एका बड्या आमदाराचे असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.यामुळे एकच खळबळ उडाली आहे. सदर रक्कम आणि इनोव्हा क्रिस्टा कंपनीचे चारचाकी वाहन क्रमांक एमएच ४५ ए.एस. २५२६ पोलिसांनी कारवाईत हस्तगत केले असून,नलवडे नावाच्या व्यक्तीची ही गाडी आहे.या कारमधून ही रोकड



सांगोल्याला नेण्यात येणार होती. तसेच घटनास्थळी पोलीस प्रशासनातील अधिकारी वर्ग तसेच तहसिदार, प्रांतअधिकारी आदी दाखल झाले आहे. तसेच आयकर विभाग,फाईंग स्कॉड देखील भेट देणार असल्याची माहिती मिळत आहे.सदर वाहनात चारजण असल्याची माहिती असून,यातील एकजण संबंधित आमदाराचा नातेवाईक असल्याची माहिती मिळत आहे.राजगड पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून,यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

# जी.बी.पांचाळ यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

येथील हु. पानसरे प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त



आदर्श मुख्याध्यापक, पेन्शनर्स असोसिएशनचे ता. सचिव, प्रभू विश्वकर्मा समाजाचे राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार प्राप्त गंगाधर भुमन्ना पांचाळ चिकनेकर( वय ७५ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने दि. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी६'५० वाजता धर्माबाद येथे राहत्या घरी निधन झाले आहे. दि. २० ऑक्टोबर रोजी दुपारी येथील वैकुंठ धाम येथे वैदिक पद्धतीने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वैजापूर पार्डी येथील शिक्षक राजेश पांचाळ, उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथील ईसीजी तंत्रज्ञ अभिनंदन पांचाळ, भोकर येथील ग्रामीण रुग्णालयातील प्रयोग शाळा वैज्ञानिक अधिकारी अत्रिनंदन पांचाळ यांचे वडील होत. अंतयात्रेस प्रचंड जनसमुदाय होता. यावेळी शोकसभा घेऊन श्रद्धांजली वाहण्यात आली.

# मा.आ.धोंडे यांनी आयोजित केलेल्या मुस्लिम बांधवांच्या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-आस्ताकभाई शेख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्याला मतदारसंघातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टी येथील युवा





नेते आस्तकभाई शेख यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती देताना आस्ताकभाई शेख यांनी सांगितले की,माजी आमदार भीमराव धोंडे हे एकमेव नेते आहेत कि,ते सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन विकास कामे करतात त्यांनी २० वर्षात मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात अल्पसंख्याक मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत.अनेकजण शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत.त्यांच्या अनेक समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी बुधवारी आष्टी येथे संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी आष्टी,पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते व समाजबांधवांनी लक्ष्मी लॉन खडकत रोड आष्टी येथे बुधवारी २३ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते आस्ताकभाई शेख यांनी केले आहे.

# फुले नगर येथील २१ वर्षीय तरुण बेपत्ता धर्माबाद पोलिसांनी जारी केली शोध पत्रिका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद शहरातील फुलेनगर येथील रहिवासी



असणारा २१ वर्षीय तरुण ज्याचे नाव शेख रेहान शेख पाशा हा दि. २९ एप्रिल २०२४ रोजी घरून रात्री ३ च्या सुमारास कार घेऊन हैदराबादचे भाडे आहे जाऊन येतो म्हणून घरून निघून गेला होता, ह्या प्रकरणी धर्माबाद पोलिसात मिसिंग क्र. १३/२४ ची नोंद घेण्यात आली असून तो आजपर्यंत अद्यापही मिळून न आल्याने धर्माबाद पोलिसांनी शोध पत्रिका जारी केले आहेत

सदरच्या तरुणाचे नाव शेख रेहान शेख पाशा वय २१वर्ष असून ज्यावेळी तो घरातून निघून गेला होता त्यावेळेस त्याचा पोशाख आकाशी रंगाचा शर्ट व काळा जीन्स पॅन्ट असा होता, त्याची उंची पाच फूट सहा इंच असून शिक्षण दहावीपर्यंत झालेले आहे, त्यास मराठी हिंदी व तेलगू भाषा ज्ञात आहे, वरील वर्णन असलेला तरुण कुणाला आढळून आल्यास त्यांनी धर्माबाद पोलिसांशी संपर्क साधावा किंवा ९४२३४४०२३६ व ८३२९७७५६२७ह्या भ्रमणध्वनी नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रोकडे यांनी केले आहेत.

# करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघासाठी सुनील बापू सावंत यांचा अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी यासाठी सुनील बापू सावंत यांनी सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रशालेत आयोजित इच्छुक मेळाव्यात अर्ज दाखल केला. मराठा समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून सावंत यांनी उमेदवारीची मागणी केली आहे.

मेळाव्यात बोलताना सावंत म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून मी मराठा समाजाच्या विविध आंदोलनांत सक्रिय सहभाग घेतला आहे. यापुढेही समाजसेवेचे कार्य अखंड सुरू ठेवणार आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडून मला उमेदवारीची खात्री आहे. करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघातील मराठा समाजासह अठरापगड समाज आणि सर्व धर्मीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. या प्रसंगी माजी नगरसेवक फारुक भाई जमादार, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष सचिन काळे, पै दादासाहेब इंदलकर आणि मनोज बापू राखुंडे यांची विशेष उपस्थिती होती. सावंत यांच्या उमेदवारी अर्जामुळे विधानसभा निवडणुकीत मराठा समाजासाठी संघर्ष अधिक गतीमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सांगलीत ओढ्याला आला पाचशेच्या नोटांचा पूर:पैसे लुटण्यासाठी झुंबड, काही जणांनी गोळा केले १० ते ५० हजार,नोटा कुठून आल्या याचा शोध सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

ओढ्याच्या पाण्यातून कचरा, सांडपाणी वाहतानाचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. मात्र, सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील अंबाबाई मंदिर परिसरातील सुख ओढ्यामध्ये चक्क वाहत ५०० रुपयांच्या शेकडो नोटा आल्या. हे वृत्त समजताच शनिवारी त्या परिसरातील नागरिकांनी ओढ्यात धाव घेत ५०० रुपयांच्या नोटा गोळा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे पंचक्रोशीतील अनेक नागरिकांनी ओढ्याकडे धाव घेतली. दरम्यान, ओढ्यामध्ये आलेली ही रक्कम ८० लाखांपर्यंत असल्याचे सांगितल्या जात आहे.

सुख नाल्यात नोटा गोळा करून दमलेल्या नागरिकांनी तातडीने या नोटा खऱ्या की बनावट याची शहानिशा करण्यासाठी विविध पतसंस्था, बँका आणि व्यापाऱ्यांकडे धाव घेतली. या नोटा खऱ्या असल्याचे वृत्त पसरल्यानंतर ओढ्याभोवती तोबा गर्दी जमली. शनिवारी आटपाडीचा आठवडी बाजार भरतो. त्यामुळे खरेदी सोडून नागरिकांनी ओढ्यात उडी मारणे पसंत केले. काही जणांनी १० ते ५० हजार रुपये गोळा केल्याचे सांगण्यात आले. हे वृत्त गावात पसरल्यानंतर तब्बल तासाभराने ओढ्याजवळ पोलिसांनी ठाण मांडले. आता पोलिस या नोटा ओढ्यात कोठून आल्या आणि कुणी कुणी या ओढ्यातले पैसे घेतले, याचा तपास करत आहेत.आटपाडी जिल्ह्यातील अंबाबाई मंदिराजवळ सकाळी साडेआठच्या सुमारास काही विद्यार्थी जात होते. या वेळी त्यांना सुख ओढ्यात काही नोटा दिसून आल्या. विद्यार्थ्यांनी बघितलेल्या त्या नोटा खऱ्या असल्याचे समजात नागरिकांची येथे झुंबड उडाली.घटनास्थळी पाचशे रुपयांच्या जुन्या १४ नोटा, १ हजार रुपयांची जुनी एक नोट, एकूण ८ हजार रुपयांच्या जुन्या नोटा आहेत. नवीन पाचशे रुपयांच्या ४ नोटा, पन्नास रुपयांच्या ३, १० रुपयांच्या अकरा, ५ रुपयांच्या २, आणि २० रुपयांची १ नोट, अशा जुन्या नवीन एकूण १० हजार २९० रुपयांच्या नोटा आढळल्या आहेत.



# आशा गटप्रवर्तकांना किमान वेतन आणि कर्मचारी दर्जा देण्यात यावा-कॉ.पडलवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तकांचा माहूर तालुका विजयी मेळावा एमटीडीसी फंक्शन हॉल येथे दि.२० ऑक्टोबर रोजी उत्सहात संपन्न झाला. आरोग्य विभागाचा कणा तसेच अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणाऱ्या आशा वर्कर आणि गटप्रवर्तकांना मानधन देण्याऐवजी त्यांना किमान वेतन देण्यात यावे व शासकीय सेवेत समायोजन करावे ह्या मागणीसाठी सीटूच्या झेंड्याखाली सातत्याने संघर्ष सुरु आहे. त्यास यश मिळत असून अलीकडे राज्य शासनाकडून दहा हजार रुपये वाढ मिळवून घेण्यात सीटू संघटनेस यश मिळाले आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक फेडरेशनचे तालुकास्तरीय मेळावे आयोजित करण्यात येत आहेत.

त्या धरतीवर माहूर तालुका येथे मेळावा घेण्यात आला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी फेडरेशनच्या अध्यक्षा कॉ.उज्वला पडलवार ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय किसान सभेचे नेते कॉ.किशोर पवार फेडरेशनच्या राज्य उपाधक्षा कॉ.शीला ठाकुर सीटूचे कॉ.कालिदास सोनुले यांची उपस्थिती होती.

शिक्षणाची जननी माता सावित्री फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले व कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.मेळाव्याचे उद्घाटन किसान सभेचे नेते कॉ.किशोर पवार यांनी करून मेळाव्यास शुभेच्छा दिल्या. फेडरेशनच्या राज्य उपाध्यक्ष शीलाताई ठाकूर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सीटूचे



जिल्हा सहसचिव कॉ.कालिदास सोनुले यांनी मार्गदर्शन केले.

मेळाव्यास तालुक्यातील आशा, गटप्रर्वत्तक मोठ्या संख्येने उपस्थीत होत्या. यावेळी अध्यक्षीय समारोपात बोलताना कॉ.उज्वला पडलवार म्हणाल्या की , सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक फेडरेशनच्या लढ्याला यश आले असून सातत्यपूर्ण आंदोलनामुळे आशाना दहा हजार रुपये मानधनात वाढ झाली आहे.

यासाठी १२ फेब्रुवारी ते १ मार्च असे २३ दिवस मुंबई येथे अखंड आंदोलनमुंबईच्या आझाद मैदानावर करण्यात आले. लढल्याने जिंकता येते हा इतिहास असल्यामुळे सीटू कामगार संघटनेचा इतिहासावर विश्वास आहे. जोपर्यंत किमान वेतन आणि शासकीय सेवेत समायोजन होणार नाही तोपर्यंत लढा सुरूच राहील असे त्या म्हणाल्या. सीटूने अनेक यशस्वी लढे देऊन कामगारांचे प्रश्न सोडविलेले आहेत असेही पडलवार म्हणाल्या.यावेळी सूत्रसंचालन सुनंदा बेहरे यांनी केले मेळाव्याचे प्रस्ताविक संगीता चव्हाण यांनी केले भारती जाधव, लता पवार, प्रतिभा चव्हाण, करुणा राऊत,निशा राठोड यांनी मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# विधानसभेसाठी शरद पवारांचे संभाव्य ४० शिलेदार ठरले

## सिंदखेडराजा तुन डॉ.राजेंद्र शिंगणे यांचे नाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

राज्यात आता महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम टप्प्यात आले आहे. दोन्ही आघाड्यांच्या नेत्यांकडून तसा दावा केला जात आहे. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा वेगाने पुढे सरकत आहे. महाविकास आघाडीकडूनही वेगात हालचाली सुरू झाल्या आहेत. जागावाटप अंतिम टप्प्यात असून काही उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं सांगण्यात येत आहे. शरद पवार यांच्या (डहरीव झुरी) राष्ट्रवादी काँग्रेसचेही जवळपास ४० संभाव्य उमेदवार निश्चित झाल्याची माहिती मिळाली आहे. अद्याप या उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र तिकीट याच शिलेदारांना मिळेल असे सांगण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. ४० उमेदवारांची यादी असून यामध्ये कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार असणार? याबाबतची माहिती समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संभाव्य उमेदवार यादी पुढीलप्रमाणे

इस्लामपूर- जयंत पाटील, तासगाव कवठे महांकाळ- रोहित पाटील, शिराळा- मानसिंग नाईक, उत्तर कराड- बाळासाहेब पाटील, कोरेगाव- शशिकांत शिंदे, फलटण - दीपक चव्हाण, माण खटाव- प्रभाकर देशमुख, शिरुर- अशोक पवार, जुन्नर-



सत्यशील शेरकर, इंदापूर- हर्षवर्धन पाटील, आंबेगाव- देवदत्त निकम, वडगाव शेरी- बापू पठारे, दौंड- रमेश आप्पा थोरात, माळशिरस- उत्तमराव जानकर, कर्जत जामखेड- रोहित पवार, काटोल- अनिल देशमुख, विक्रमगड- सुनील भुसारा, घनसावंगी - राजेश टोपे, बीड- संदीप क्षीरसागर, मुंब्रा- जितेंद्र आव्हाड, जिंतूर- विजय भांबळे, अहेरी- भाग्यश्री अत्राम, सिंदखेड राजा- राजेंद्र शिंगणे, उदगीर- सुधाकर भालेराव, घाटकोपर पूर्व- राखी जाधव, परळी- राजाभाऊ पड, लक्ष्मण पवार- गेवराई, आष्टी- भीमराव धोंडे, केज- पृथ्वीराज साठे, माजलगाव- रमेश आडसकर, राहुरी- प्राजक्त तनपुरे, देवळाली- योगेश घोलप, दिंडोरी - गोकुळ झिरवाळ, मुक्ताईनगर - रोहिणी खडसे, जामनेर- गुलाबराव देवकर, अकोला- अमित भांगरे, पारनेर- राणी लंके, खानापूर - सदाशिव पाटील, चंदगड- नंदाताई बाभूळकर, इचलकरंजी- मदन कारंडे,

## सुरेश दादा गायकवाड यांच्या उमेदवारीसाठी भास्करराव पाटील खतगावकर यांच्या कडे बिलोली तालुक्यातील जनतेने केली उमेदवारीची मागणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी ९० देगलूर-बिलोली विधानसभा (डउ) मतदार संघात आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेश गायकवाड यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी देण्यात यावे यासाठी माजी मंत्री माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर साहेबांकडे बिलोली शहर , बिलोली ग्रामीण व तसेच कुंडलवाडी शहर व परिसरातील सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव ,कर्मचारी यांनी मागणी केलेली आहे. यावेळी संजय जाधव, मा.नगराध्यक्ष बिलोलीपी. आय.गायकवाड, भास्कर भेदेकर प्रमुख फुले आंबेडकर क्रांती मंच, नागसेन जिगळेकर उपसरपंच जिगळा,इंद्रजीत डुमणे फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच युवा नेते, विनोद फकिर मा. सरपंच प्रतिनिधी केसराळी, भीमराव बडूरकर पत्रकार, दिलीप घाटे पत्रकार, गणपत वाघमारे सरपंच बेळकोणी, धम्मपाल जाधव, गौतम लंके पत्रकार, परमेश्वर वाघमारे माजी. सरपंच चिरली टाकळी, शंकरराव वाघमारे ग्रामपंचायत सदस्य चिरली, चंद्रकांत वाघमारे, सुनील कदम पत्रकार, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे, बाबुराव सोनकांबळे, लक्ष्मण जाधव, गौतम कांबळे, कीर्तिराज कांबळे, साईनाथ कैवारे, तुकाराम कैवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# कु.सायली ढेबे हिस महाराष्ट्र स्टार गौरव पुरस्कार प्रदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । बबनराव धायतोंडे**

विद्यानिकेतन सोशल फाउंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र स्टार गौरव पुरस्कार २०२४ या कु.सायली ढेबे यांना प्रदान करण्यात आला. विद्यानिकेतन संस्थेचे वरिष्ठ मंडळी तसेच डॉ.अशोक नगरकर सर(ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पुणे),मा.भिडेवाडाकार विजय अभिमान वडवेराव (आयोजक: भिडेवाडा देशातील मुलींची पहिली शाळा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियान )सौ.प्रियांका शिंदे ( सिने अभिनेत्री ), मा. श्री. संतोष नलावडे (सिने अभिनेते) व इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सायली ढेबे यांचे सामाजिक, पत्रकारिता,साहित्य, कलाक्षेत्र, शैक्षणिक या क्षेत्रांतील त्यांची कामगिरी पाहता महाराष्ट्र स्टार गौरव पुरस्कार २०२४ च्या त्या मानकरी ठरल्या. हा भव्य दिव्य पुरस्कार सोहळा क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती,संचलित खिंवसरा पाटील शिक्षण संकुल, गणेशनगर,थेरगाव येथे पार पडला. यावेळी त्यांचे आई-वडील बाळू ढेबे व संगीता ढेबे देखील आपल्या कन्येच्या पुरस्कारासाठी उपस्थित होते. विद्यानिकेतन सोशल फाउंडेशन (तडतडड) चे व इतर मान्यवर उपस्थित असलेल्या कामकाज हे बहुमोलाचे ठरले,तसेच संपूर्ण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ओबीसीचा सर्वपक्षीय उमेदवार म्हणून अॅड.भारत चामे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदपूर । प्रतिनिधी**

सकल ओबीसी, अल्पसंख्याक, भटक्या,दलीत, बहुजन समाजाचा अहमदपूर विधानसभा मतदारसंघात सर्वपक्षीय एकच उमेदवार म्हणून अॅड. भारत चामे यांच्या नावाची घोषणा पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आली. अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सर्वराजकीय पक्षातील सकल ओबीसी समाज बांधवांच्या अनेक व्यापक बैठका झाल्यानंतर आज कोअर कमिटीची बैठक क्राइस्ट इंग्लिश स्कूल मध्ये घेण्यात आली. सदरील कोअर कमिटीनी इच्छुक उमेदवार माजी आमदार बब्रुवान खंदाडे,गणेश दादा हाके, अॅड.भारत चामे,अॅड.माधवराव कोळगावे यांच्या मुलाखती घेतल्या उमेदवारी बद्दल कोअर कमिटी मध्ये एकमत होत नसल्याने इच्छुक उमेदवारांच्या सहमतीने कोअर कमिटीच्या सदस्यांचे गुप्त मतदान घेण्यात



आले.मतपत्रीकेची मोजणी सर्वांसमक्ष करण्यात आली.त्यामध्ये अॅड. भारत चामे यांना सर्वाधिक मतदान मिळाल्यामुळे अॅड.भारत चामे यांचे नाव अहमदपूर येथील जिजाऊ फंक्शन हॉल मध्ये पत्रकार परिषद घेऊन घोषित करण्यात आले.

सकल ओबीसी, अल्पसंख्याक,विमुक्त भटक्या,दलीत ,बहुजन समाजाचा अहमदपूर, चाकुर तालुक्यातील सर्व पक्षीय अपक्ष उमेदवार म्हणून अॅड.भारत चामे यांच्या नावाची घोषणा कोअर कमिटीच्या सदस्यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. सदरील कोअर कमिटीच्या बैठकीस माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गणेश दादा हाके पाटील,डॉ.अशोक सांगवीकर,एन. आर. पाटील, भारत रेड्डी, जिवणकुमार मद्देवाड, अॅड. भारत चामे,सांब महाजन, अशोक काका केंद्रे,त्रंबक आबा गुट्टे,किशोर मुंडे, अॅड.माधवराव कोळगावे, बालाजी रेड्डी, चंद्रकांत मद्दे, नितीन रेड्डी,गंगाधर केराळे,श्रीकांत बनसोडे,सज्जन लोणाळे गोविंद गिरी,मधुकर मुंडे,मार्शल माने, शंकर चाटे, सुरेश मुंडे, हणमंत देवकते, माणीक नरवटे, पंडित पवार, सलीम तांबोळी, आत्माराम डाके यांच्या सह अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सर्वपक्षीय सकल ओबीसी,अल्पसंख्याक,भटक्या,दलीत, बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचे आभार गोविंद गिरी यांनी मानले.

## संयुक्त पत्रकार बहुद्देशी संस्था उमरखेड व यूट्यूब व डिजिटल मीडियाचे

# पत्रकार व साप्ताहिक पत्रकार संघाच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरखेड आयोगाकडे केली तक्रार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांवर दुजाभाव करणाऱ्या उमरखेड येथील शासकीय माहीती अधिकारी गजानन परटके यांची हाकालपट्टी करण्याची मागणी ग्रामीण व शहरी पत्रकारांनी केली आहे.

उमरखेड तालुक्यातील माहीती अधिकारी गजानन .परटके हे पत्रकारामध्ये दुजाभाव करून आपल्या मर्जीतील पत्रकारांना मिटींगला बोलवतात त्यामुळे ते ज्या पत्रकारांना ते बोलवीत नाही त्या पत्रकारांना विविध माहिती पासून वंचित राहावे लागत आहे . पत्रकार हा पत्रकार असतो, माहिती अधिकारी यांनी येथील सर्व पत्रकारांना त्यांची कडील माहिती देणे कर्मप्राप्त आहे परंतु संबंधित अधिकारी हे ज्या विशिष्ट पत्रकार सोबत ओली पार्टी करतात त्याच पत्रकारांना माहिती देऊन इतरांना कोणत्या हेतूने माहिती देण्याचे टाळतात हे समजत नाही.संबंधित अधिकारी हे पत्रकार मंडळी तर्फे करण्यात येत असलेल्या कर्तव्यात कसूर करीत असल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करून तातडीने बदलीची कारवाई करावी अशी मागणी संयुक्त पत्रकार बहुद्देशीय संस्था उमरखेड चे वतीने करण्यात आली मागणी पूर्ण न झाल्यास संयुक्त पत्रकार संघ व साप्ताहिक युट्युब डिजिटल मीडिया ग्रामीण पत्रकार मिळून रस्त्यावर सज्ज असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना देण्यात आलेल्या निवेदनातून दिली आहे. यावेळी संयुक्त बहुउद्देशीय पत्रकार संस्था उमरखेड चे शेख इरफान, रितेश पाटील कदम, सुरेंद्रनाथ दळवी, गजानन वानखेडे, सय्यद रहीम रजा अवधूत खडककर, स्वप्निल मगरे, ज्ञानेश्वर लोखंडे, शेख तहसीन, सय्यद खाजाभाई, शुद्धोधन दिवेकर, प्रभाकर पाईकराव, बबलू भालेराव, मुजीब लाला, फिरोज लाला, सुनील ठाकरे, सिद्धार्थ दिवेकर तसेच डॉक्टर आंबेजोगाई कर यांचे सह बरीच पत्रकार मंडळी उपस्थित होते.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904